दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार २५ मे २०२४ | अंक१६६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

# मला राज्यातून काढलं तर मी . इकडले मराठे तिकडल्या राज्यात बोलवून मोर्चे काढेन.मनोज जरांगे

**(बीड प्रतिनिधी)**

"मला राज्यातून काढलं तर मी लई शहाणा आहे. इकडले मराठे तिकडल्या राज्यात बोलवून मोर्चे काढेन. जेलातले सगळे मराठे कैदी एकत्र करून मोर्चा काढीन. पण समाजाशी गद्दारी करणार नाही. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब जेलमध्ये टाकाल. पण 6 कोटी मराठ्यांचं काय करणार राजकारणात हलक्यात घेऊ नका.



सगळ्यांची टांगे पलटी करेन. आरक्षणाचा गुलाल टाकल्याशिवाय शांत बसणार नाही", असा इशारा मराठा नेते मनोज जरांगे यांनी दिला."मराठ्यांना ओबीसी आरक्षण मिळू द्यायचं नाही, असं षडयंत्र होतं. काही लोकांचं म्हणणं होतं की, मी जातीवाद करतोय. मराठा-ओबीसी वाद होतोय. माझं एक तरी स्टेटमेंट दाखवा की, मी ओबीसींना दुखावलं. मी गावखेड्यातल्या ओबीसी बांधवांना आतापर्यंत दुखावलं नाही. जातीवाद केला कुणी? तुम्ही आम्हाला जातीवादी म्हणता कसे? मी 13 तारखेच्या मतदानापर्यंत चांगला होतो. 13 तारीख झाली. मतदान संपलं. मग गुरगुर सुरू झाली", अशी टीका मनोज जरांगे यांनी केली.'वेळ जर आली तर...'"महाराष्ट्र हा पुरोगामी विचारांचा आहे. 1 महिना शांत राहा, काही जण म्हटले निवडणूक झाल्यावर बघू. त्यांचेच लोक त्यांना पाडणार आहेत. कोणी काय पोस्ट टाकल्या त्याचं नाव लिहून ठेवा. एक महिना बघू. शेवटी नड्याला लागल्यावर आहेच आम्ही, तुमच्यावर जर वेळ आली तर स्व:तचं संरक्षण करा. त्या जातीचा त्यांचा नेता कधीच निवडूण येऊ द्यायचं नाही. वेळ जर आली तर आपला उमेदवार द्यायचा नाही पण पाडल्याशिवाय राहायचं नाही. ज्या जातीचा नेता मराठा विरोधी भूमिका घेईल त्याला निवडून येऊ द्यायचं नाही", असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं. "क्रांती मोर्चे शांततेत होते. आम्हाला जातीवादी म्हणता प्रतीमोर्चे काढले कुणी? त्याचं सोडून द्या. कुठे दिसतोय का? आपल्या नादी लागल्यावर कुठचं दिसत नाही. समाजाने काय करायचं नाही. काय करायचं हे फायनल ठरलं. कुणी कुणावर टीका करायची नाही. निकाल लागल्यानंतर कुणाचाच जयजयकार करायच नाही. एकजूट फुटू देऊ नका. मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण मिळू देणार नाही म्हणत होते मिळालं की नाही?", असा सवाल मनोज जरांगे यांनी केला. "मला म्हणायचे ओबीसीतून आरक्षण मागितलं तर दंगली होतील. इथून मराठा समाजाच्या नोंदी सापडल्यामूळे दंगली झाल्या नाहीत. मराठ्यांच्या शेकडो वर्षांच्या नोंदी आहेत. भारतात सर्वात जुना ओबीसी मराठा आहे. आमच्या नोंदी राहून तुम्ही ओबीसीत येऊ नका म्हणता. ओबीसी महामंडळ एकट्याने 80 टक्के खालं त्याने", असं मनोज जरांगे म्हणाले.

## गंगापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सत्यजित ताईतवाले व अंमलदार अमोल कांबळे यांचा केला सन्मान

**सुनिल झिंजूर्डे पाटील**

गंगापूर : गेल्या महिन्यात गावठी कट्टयासह एकाला जेरबंद करून खुनाच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा झालेल्या आरोपीच्या मुसक्या आवळण्यात यशस्वी कामगिरी करणाऱ्या गंगापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सत्यजित ताईतवाले व अंमलदार अमोल कांबळे यांना पोलिस अधीक्षक मनीष कलवानिया यांच्या हस्ते गुरुवारी सन्मानित करण्यात आले. 1 एप्रिल रोजी रात्री ताईतवाले व त्यांच्या सहकाऱ्यांनी शहराजवळ आरोपी कानिफनाथ मावस यास एक गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसासह पाठलाग करून ताब्यात घेतले होते. या कामगिरीची दखल घेऊन ताईतवाले यांना कलवानी यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.




तसेच, शिऊर ठाण्याच्या हद्दीत २०१८ मध्ये झालेल्या खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी भिकन पठारे यास १४ मार्च रोजी न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या गुन्ह्यात शिऊरचे तत्कालीन कर्मचारी व आता गंगापूर ठाण्यात कार्यरत अंमलदार कांबळे यांचा देखील सन्मान करण्यात आला.

## महिला उद्योजिका मनीषा पोकळे यांचा सत्कार

**कुडूत्री प्रतिनिधी**

मुंबई येथील कला क्रीडा सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रासह आदिवासी पाड्यासाठी कार्यरत असणाऱ्या प्रेरणा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने संगीत वाद्यवृंद कला क्षेत्रातील सौ मनीषा दिनेश पोकळे यांना "महिला उद्योजिका गौरव "पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. येथील धनलक्ष्मी महिला बचत गटाच्या महिला पदाधिकारी यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला अध्यक्षस्थानी जेष्ठ सदस्या सौ लक्ष्मी किरुळकर होत्या .

स्वागत कु. प्रतिक्षा किरुळकर यांनी केले अंगणवाडी सेविका सौ मनीषा किरुळकर यांनी प्रास्ताविक केले सौ मनीषा पोकळे यांनी आपले पती दिनेश यांच्या मार्गदर्शनाखाली मुलगा यश व साई यांच्या सहकार्याने संगीत क्षेत्रातील विविध वाद्यांची निर्मिती करून समाजात महिला स्वावलंबी कशा बनतात याचा आदर्श घालून दिला तसेच पती दिनेश पोकळे यांनी संगीत क्षेत्रात दिलेले योगदान याबद्दल



सौ.मनिषा पोकळे यांना प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह व विविध भेटवस्तू देऊन ट्रस्टच्या वतीने सन्मानित करण्यात आले. सौ आक्काताई किरुळकर, सौ.आनंदी किरुळकर ,सौ.पार्वती किरुळकर ,सौ.धोंडूबाई किरुळकर ,सौ.सारिका पाटील,सौ स्वाती जाधव (आणाजे) ,सौ.माया बुगडे (घुडेवाडी),सौ.छाया पाटील (मोहडे) ,सौ.अलका बरगे, (बरगेवाडी)सौ विमल किरुळकर,(मुसळवाडी) श्रीमती. आनंदी किरुळकर, सौ.इंदुबाई उर्फ आनंदी किरुळकर ,सौ शितल किरुळकर,सौ. माया किरुळकर सौ. अर्चना किरुळकर,सौ दिपाली किरुळकर ,सौ.जयश्री किरुळकर ,सौ राणी किरुळकर ,सौ पूजा किरुळकर आदी महिला सदस्य उपस्थित होत्या. सौ सुवर्ण किरुळकर यांनी आभार मानले.

## आई,वडीलांच्या मदतीनं सासु,सासऱ्यांना अन्नात विषारी औषध टाकले.!

**प्रतिनिधी/बीड**

माजलगाव. प्रतिनिधी- तालुक्यातील देपगाव वस्तीत राहणाऱ्या सुनेन आई,वडीलांच्या मदतीनं सासु, सासऱ्यांना बेसणात विषारी औषध टाकून जीव धोक्यात घालण्या चा प्रयत्न केला पण रुग्णामध्ये योग्य उपचार केल्यानं दोघांचाही जीव वाचला. या निंदणीय घटने विषयी माहिती मिळाल्याने आमच्या प्रतिनिधीने प्रकरणातील फिर्यादी पिडीत संभाजी विश्वनाथ हजारे शेतकरी रा.भोगलवाडी,ता.धारुर ह.मु.देपेगाव वस्ती,ता.माजलगाव यांच्याशी २४मे रोजीच्या रात्री ८:०९वा.त्यांच्या मोबाईल नंबर वर संवाद साधला असता त्यांनी सांगितले की, प्रकरणातील आरोपी त्यांचा इवाई नामे विठ्ठल काळे ,इनबाई नामे उर्मीला विठ्ठल काळे रा.देपेगाव,ता.माजलगाव यांनी त्यांची मुलगी आणि संभाजी हजारे यांची सुन नामे तेजस्विनी अच्युत हजारे सोबत संगनमत करून २१मे रोजीच्या सायंकाळी ६वा.घरी आले होते. कारण सासु सुनेला चांगले नांदवत नसल्याचा गैरसमज निर्माण झाल्यामुळे त्यांनी चांगले नांदवले पाहिजे म्हणून कसले तरी औषध आणले होते आणि ते जेवणातील बेसनात टाकल्याने संभाजी आणि त्यांच्या पत्नी ने खाल्यानंतर विषबाधा झाली.विशेष म्हणजे विठ्ठल, उर्मीला सह तेजस्विनी ने ते बेसन न खाता खिचडीच खालली आणि मुलगा अच्युत हजारे अगोदरच बाहेरुनच जेवण करून आला होता. यावर उपरोक्त उल्लेखित आरोपींनी अन्नात विषारी औषध टाकून जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे असा आरोप संभाजी हजारे यांनी करुन प्रकरणी तपासी अमलदार माजलगाव ग्रामिण पोलीस ठाण्याचे राठोड यांनी आरोपीं सोबत आर्थिक व्यवहारातून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून त्यांना अटक केली नाही असा हि आरोप करत आज त्यांनी त्यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात येणार असल्याचे संभाजी हजारे यांनी सांगितले आहे.

## प्रा. शेंडगे आणि प्रा. जाधवफ्फयांच्या संशोधनाला यश, आंतरराष्ट्रीय पातळीच्या उपकरणाला भारत सरकारची मान्यता प्राप्त.

फार्मसी क्षेत्रात अत्यंत गरजेचे मानले जाणारे 'टॅबलेट डिझोलुशन ॲपरेटस' हे उपकरण औषधी गोळ्या आणि कॅप्सुल यांची गुणवत्ता तपासण्यासाठी प्रत्येक देशातील औषधी कंपनी, औषधे सबंधित सरकारी नियमाक संस्था वापरते. या उपकरणामध्ये केलेल्या तपासणीच्या आधारे फार्मास्युटिकल कंपनीने तयार केलेल्या टॅबलेट (गोळ्या) आणि कॅप्सुल मार्केट मध्ये विकण्यासाठी योग्य आहेत की नाही हे ठरवले जाते. या अत्यंत महत्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या उपकरणात नावीन्य पूर्ण बदल करत त्यात अत्यंत सोप्या आणि सुलभ पद्धतीने हाताळता येणारे अधिकचे पण गरजेचे पॅरामिटरस ॲड करून एक नवीन उपकरण (यंत्र) प्रा. शेंडगे आणि प्रा. जाधव यांनी बनवले आहे.

## लागवडीपुर्वी कृषी विभागाने बोगस बियाणे खतांची तपासणी करावी

### शेतकऱ्यांची लुट अनब अडवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी

**प्रतिनिधी**


खरीप हंगाम तोडावर आला. अंदमान निकोबारमध्ये मान्सुनचे आगमन झाले. पुढील आठवड्यात मान्सुन राज्यामध्ये दाखल होणार आहे. पाऊस पडण्याआधी शेतकरी लागवडीपुर्वीच्या मशागतीत गुंतलेला आहे. तसेच पाऊस पडल्यानंतर शेतकरी बि बियाणे खरेदी करणार आहे. काही शेतकर्यांनी बियाणे आणि खते दुकानदाराकडे बुकींग करून ठेवले. शेतकर्यांची आडवणूक आणि आर्थिक लुट होवू नये याची काळजी कृषी विभागाने घ्यायला हवे कधीकधी बोगस खते आणि बियाणे शेतकर्यांची माथी मारले जातात. याबाबतही चौकशी करायला हवी यंदाचा उन्हाळा अत्यंत कडक गेला. खरीप हंगाम तोडावर आला. खरीपाच्या लागवडीपुर्वी शेतकर्यांनी शेती मशागतीला सुरूवात केली. एक दोन चांगले पाऊस झाल्यानंतर लागवडीला सुरुवात होवू शकते. पाऊस पडल्यानंतर बि बियाणे आणि खते खरेदी करण्यासाठी शेतकर्यांची कृषी दुकानदाराकडे मोठी गर्दी असते. बीड जिल्ह्यात




कापुस आणि सोयाबीनची मोठ्या प्रमाणता लागवड होते. यामुळे कापसाचे बियाणे विविध कंपनीचे खते खरेदी केली जातात. गेल्या वर्षी अनेक शेतकर्यांच्या सोयाबीनने धोका दिला होता. सोयाबीन उगवल्या नसल्याच्या तक्रारी होत्या. बोगस बियाण्यामुळे सोयाबीन उगत नाही तर कधी कधी सोयाबीनला शेंगा सुध्दा येत नाहीत. बाजारात उत्तम दर्जाचे खते आणि बियाणे आहेत का याची खात्री कृषी विभागाने आतापासुनच करायला हवी. बोगस बियाणे विक्री करणार्या दुकानदारा विरोधात कारवाई कारवाई करायला हवी. एखाद्या कंपनीच्या खताचा तुटवडा करून लुट केली जाते. असे प्रकार ही थांबवायला हवे. प्रत्येक दुकानदाराने बियाणे आणि खताच्या दराचे भाव फलक आपल्या दुकाना समोर लावावेत अशा पध्दतीचे निर्देश कृषी विभागाने संबंधित दुकानदाराला देण्याची गरज आहे. जिल्ह्यात ८ ते ८.५० लाख हेक्टर खरीपाचे क्षेत्र आहे. त्यातील ३ ते ३.५० लाख हेक्टरमध्ये कापसाची लागवड होत असते. गेल्या वर्षी प्रमाणेच याही वर्षी कापसाचे मोठ्या प्रमाणात लागवड होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# जाती-अंताच्या चळवळीला जागतिक स्तरावर नेणारे कर्मवीर - एकनाथ आवाड जिजा

25 मे ही कर्मवीर एकनाथराव आवाड - ज्यांना प्रेमाने “जिजा” म्हटले जाते – ह्यांचा स्मरणदिवस. जिजांना जाऊन आज 9 वर्ष होत आहेत परंतु ‘मरावे परी कीर्ती रूपी उरावे’ ह्या उक्तीनुसार ते आजही आपल्याला प्रेरणा देत आपल्या सोबत आहेत. मांग जातीच्या पोतराजाच्या एका साधारण कुटुंबात जन्मलेली एक व्यक्ति हलाखीच्या परिस्थितीत शिकून, बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा अवलंब करून, जाती-अंताची व त्याद्वारे सामाजिक समतेची मशाल लाखों वंचितांच्या हातात देवून जातो हे जितके खरे आहे तितकेच कल्पना करण्यापलिकडलेही आहे! मला माझ्या अभ्यासाच्या योगाने जिजांनी 1989 साली स्थापन केलेल्या ‘मानवी हक्क अभियान’ ह्या संघटनेतील कार्यकर्ते, पदाधिकारी, शेकडो दलित आणि वंचित परिवार ज्यांच्या आयुष्याला जिजारूपी परिसाचा स्पर्श झाला त्यांचासोबत वेळ घालविण्याचा योग आला. मी माझे अनुभव कथन माझे 6 वर्षापासूनचे अमेरिकेतील वास्तव्य, माझ्या जमीन आणि जात ह्या संबंधातील पुस्तकी अभ्यास आणि मराठवाड्यातील क्षेत्र भ्रमण ह्या आधारे केले आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या ‘जातीव्यवस्थेचे निर्मूलन’ (Annihilation of Caste) ह्या लेखाला 15 मे रोजी 88 वर्षे पूर्ण झाली. जिजांनी प्रत्येक श्वास ह्या लेखात लिहिलेल्या तत्त्वांना प्रत्यक्षात आणण्यासाठी मोलाने खर्ची घातला. भारतासारख्या देशात जेथे जातीव्यवस्थेची मुळं शेकडो वर्षापासून घट्ट पाय रोवून आहेत तिथे हे काम वाटतं तेव्हढं सोप्प नाही. ह्या कामाची सहसा लोकांना कल्पना देखील येऊ शकत नाही. ह्या अथक प्रयत्नात कित्येकदा जिजांवर प्राणघातक हल्ले झाले. जिजांना ही जाणीव होती की जातीअंताचा लढा हा कित्येक शतके अर्ध्यपोटी गुलामगिरी करणारा समाज हा उपाशी राहून करणं शक्य नाही. म्हणून गायरान आणि सरकारी जमीन काबीज करण्याच्या मोहीमेचे बाबासाहेब आंबेडकर आणि दादासाहेब गायकवाड यांच्यानंतर जिजांनी नेतृत्व करून तिला महत्तप्रयासाने सामाजिक पटलावर महत्त्वाचं स्थान आणलं. प्राथमिक अवलोकनावरून गायरान जमिन काबीज करण्याचा उद्देश हा केवळ त्यावर शेती करून पोटापाण्याचा प्रश्न सोडवणे इतका साधा वाटला तरी तो तेव्हढाच मर्यादित नाही. बहुल्य दलित समाज ग्रामीण भागात राहत असल्यामुळे गायरान जमीन काबीज करणे हा जाती-अंताच्या तात्त्विक लढाईचे एक महत्त्वाचे प्रात्यक्षिक आहे. हजारो वर्षापासून जाती-आधारित विभागलेल्या समाजात, दलित आणि इतर वंचित समुदायाने प्रस्थापितांच्या विरुद्ध जावून गावातील शेकडो एकर गायरान जमीन ताब्यात घेणं गरजेचं होतं. त्यासाठी लागणारी हिम्मत व आत्मविश्वास ह्या वंचित समुदायात भरवणं आणि प्रस्थापितांच्या मनात दडपण निर्माण करणं अतिशय महत्त्वाचं होतं. अर्थातच त्यासाठी लागणारी हिम्मत, हुशारी, आणि मुत्सद्दीपणा जिजांकडे पुरेपूर होता किंबहुना त्यांनी तो चळवळीत असतानाच जैविकरित्या (organically) अंगिकारला होता. माझ्या मराठवाडा भ्रमणात मला कित्येक परिवार भेटले की ज्यांचासाठी जमीन अर्धा की पांच एकर आहे, बागायती की कोरडवाहू आहे ह्यापेक्षा स्वतःच्या जमीनीचा तुकडा असण्याचा स्वाभिमान हा बेशकिमती आहे असे वाटते!



प्रस्थापितांकडची लाचारी नाकारून मानाने जगण्याची कला जिजांनी पोटच्या पोरासारखी आम्हाला शिकवली हे जेव्हा कित्येक गावातून कानावर पडतं तेव्हा तुमच्या डोळ्यात पाणी आल्यावाचून राहत नाही. जिजांच्या भाषणाच्या आठवणी आजही लोकांच्या अंगावर शहारे आणतात. कित्येक लोकांची आयुष्य फक्त जिजांची भाषणं ऐकून बदलली आहेत हे आश्चर्यकारक वाटलं तरी नितांत खरं आहे. जिजांनी आमची मुलं शिकवून कलेक्टर व्हावीत म्हणून झोळी पसरून आमच्याकडे भीक मागितली म्हणून मी माझी मुलं शिकवली असे म्हणणारे कित्येक भेटले. लोकांनी जिजांची भाषणं ऐकून व्यसनं सोडली, बाल-विवाह थांबवले, निवडणुकी लढवल्या, स्वतःची जमीन विकत घेऊन घरं बाधली आणि स्थलांतर थांबवले, असे कित्येक अनुभव मराठवाड्यातल्या कानाकोपर्यातल्या गावची लोकं डोळ्यात पाणी आणून सांगतात तेव्हा जिजांची ही कर्तबगारी ऐकुन गुंगी येते. मग त्यांनी आपल्या घरात गौतम बुद्ध, बाबासाहेब आंबेडकर, सावित्री-जोतिबा फुले, अण्णाभाऊ साठे ह्यांचा रांगेत जिजांना बसवले ह्यात आश्चर्य ते काय? महाराष्ट्रातील एक लाखाहुन अधिक विविध जाती-धर्माच्या कुटुंबांचे भविष्य मानवी हक्क अभियानाच्या चळवळीतून आमुलाग्र बदलले आहे. अभ्यासपूर्वक आणि जवाबदारीने मी हे मांडू इच्छितो की मानवी हक्क अभियानाची जाती-अंताद्वारे जमीन मिळवून स्वाभिमानाने जगायला शिकवणारी चळवळ ही केवळ महाराष्ट्र, भारत किंवा दक्षिण आशिया खंडातच नाही तर वैश्विक स्तरावरची महत्त्वाची चळवळ आहे. लॅटिन अमेरिकेन खंडातील ब्राजील देशातील Landless Workers Movement (Movimento dos Trabalhadores Rurais Sem Terra; MST) चळवळ ही नक्कीच मानवी हक्क अभियानाच्या तोडीची आहे असे म्हणणे अतिशयोक्ति ठरणार नाही! अमेरिकेतील वर्णद्वेषाविरुद्ध लढलेले रोजा पार्क आणि मार्टिन ल्युथर किंग, जु.; ब्लॅक पँथर चे संस्थापक बॉबी सील आणि हुयी न्यूटन; नॅशनल असोसिएशन फॉर द अडवांसमेंट ऑफ कलर्ड पीपल (NAACP) चे डबलयू. बी. ई. डी बॉय, ठरगवूड मार्शल, रॉय विलकीन्स यांचा इतकेच महत्त्वाचे काम कर्मवीर एकनाथराव आवाड यांनी मानवी हक्क अभियानाच्या वतीने जातीअंतासाठी केले आहे. प्रतिकूल परिस्थितीत ह्या चळवळीसाठी झोकून दिलेले मानवी हक्क अभियानाचे असंख्य कार्यकर्ते आणि प्रसंगी आपले प्राण पणास लावून गायरान काबीज केलेले लाखों परिवार अभिनंदनास पात्र आहेत. ह्या जागतिक स्वरूपाच्या चळवळीचे नेतृत्व करणारे कर्मवीर एकनाथराव आवाड “जिजा” हे महाराष्ट्राचेच नाहीत तर भारताचे “रत्न” आहेत. असे असताना त्यांना आजपर्यंत भारत सरकारचा पद्म पुरस्कार न मिळणे ही शोकांतिकाच म्हणावी लागेल. चळवळीत जिजांना त्यांची पत्नी श्रीमती गयाबाई आवाड “जिजी” यांची लाभलेली साथ ही तितकीच महत्त्वाची आहे. त्यांनी कुटुंब सांभाळतच चळवळीला हातभार लावला आणि राजकारणाच्या माध्यमातून समाजातले प्रश्न तडीस नेले. सूक्ष्म सामाजिक भान, जाणिवेतून निर्माण केलेली कर्तबगारी आणि तरीही कमालीची विनम्र असणारी मुलं सौ. शालन, डॉ. मिलिंद, आणि डॉ. सुरेखा ह्यांच्या जडण-घडणीत जिजांसोबत जिजींचाही कमालीचा वाटा आहे. जिजांपश्चात मानवी हक्क अभियानाच नेतृत्व प्रा. डॉ. मिलिंद आवाड यांचासारखा अभ्यासू, कुशल, आणि द्रष्टा व्यक्ति करत आहे हे चित्र सुखावह, ऊर्जादायी आणि आशावादी वाटणारं आहे. वेगाने बदलणाऱ्या समाजव्यवस्थेत सामाजिक चळवळींचे स्वरूप काय असेल आणि ती भूमिका अभ्यासपूर्वक कशी मांडता येईल ह्याचे वैश्विक चिंतन करण्याची क्षमता आणि ते तडीस नेण्याची कार्यनिपुणता प्रा. डॉ. मिलिंद आवाड यांच्याकडे आहे ह्याची जगभरातल्या माझ्यासारख्या कित्येक अभ्यासक आणि कार्यकर्त्यांची पूर्ण खात्री आणि विश्वास आहे. ‘आमचा लढा न्यायासाठी, माणूस म्हणून जगण्यासाठी’ असं ब्रीदवाक्य असणाऱ्या मानवी हक्क अभियानाची चळवळ ही जाती-अंताची असली तरी तिचा उद्देश हा असमानतेच्या वृत्तीवर घाव घालणे आहे. असमानता दाखवणाऱ्या जनसमुदायावर हल्ला करणे नाही. हा फरक समजावून घेणं हे अत्यंत महत्त्वाचे आहे – हा फरक कळला नाही तर चळवळीच्या उद्देश जातीचा अंत करण्याऐवजी जाती-अंताला विरोध करणाऱ्यांचा लक्ष्य करणे असा घेऊन चळवळ हिंसक आणि रक्त-रंजीत बनू शकते. मी अशा कित्येक संवेदनशील उच्च-जातीय लोकांना भेटलो ज्यांना जिजांच्या व्यक्तिमत्वाबद्दल आणि त्यांच्या चळवळीपददल नितांत आदर आहे किंबहुना ते त्यांचे पुरस्कर्ते आहेत! जिजा आपल्या चळवळीला सहजाचं ‘दलित’ हक्क अभियान हे नाव देवू शकले असते पण तसं न करता त्यांनी ‘मानवी’ हक्क अभियान हे शीर्षक देऊन आपली सर्वसमावेशक भूमिकाच समोर आणली आहे. जिजांच नेतृत्व हे केवळ मांग समाजापर्यंत सीमित करण किंवा त्यांना फक्त ‘दलितांचा पुढारी’ मानण हे सूर्याला काजवा म्हणण्यासारखं आहे. बाबासाहेब आंबेडकरांना ‘दलित पुढारी’ मानून त्यांच्या व्यासंगाचे रिंगण छोटे करण्याची कुचेष्टा आधीच आपल्या समाजाने केली आहे. ही त्याचीच पुनरावृत्ति म्हणायची. आपण सर्वांनीच जिजांच्या बाबतीत होणारी ही कुचेष्टा प्रयत्नपूर्वक हाणून पाडली पाहिजे व जिजांची ‘मानव’ असण्याची व्यापक संकल्पना पुढे नेली पाहिजे! जिजांचं काम हे अमूल्य आहे ह्यात कोणालाही यत्किंचितही शंका नसावी. भाषण करताना ‘शाहू-फुले-आंबेडकर’ म्हणायची प्रथा महाराष्ट्रात आहे. ह्या तिकडीत कर्मवीर एकनाथराव आवाड यांना बसवण्याची आता वेळ आली आहे. आज जिजांच्या स्मरणदिनाच्या निमित्ताने आपण आपल्या संबोधनात ‘शाहू-फुले-आंबेडकर-आवाड’ बोलण्याची प्रथा जाणीवपूर्वक सुरू केली पाहिजे. असे केल्याने शाहू, फुले आणि आंबेडकर हे आपल्याला परलोकी योग्य साथीदार मिळाला असं वाटून आनंदून गेल्याशिवाय राहणार नाहीत...!

विशाल जामकर (मोबा: 77381 95785) हे यूनिवर्सिटी ऑफ मिंनेसोटा, अमेरिका येथे जमीन आणि जात ह्या संबंधावर पीएचडी करत आहेत. ते चार महिन्यापासून माजलगाव, बीड येथे मुक्कामाला असून आपल्या अभ्यास दौऱ्यात मराठवाड्यातील मानवी हक्क अभियानाशी संबंधित परिवार आणि कार्यकर्ते तसेच स्थानिक राजकारणी आणि अधिकारी यांच्याशी वार्तालाप करत आहेत...

# ज्येष्ठ उद्योजक मा.श्री.संजयजी जोशी यांची मातृभूमी शिक्षण संस्थेला लाख मोलाची मदत -प्रा.अण्णासाहेब राऊत.

**प्रतिनिधी/नाळवंडी**

ज्येष्ठ उद्योजक मा.श्री.संजयजी जोशी यांचा दि.२१ मे २०२४ रोजी ६६ वा वाढदिवस साजरा झाला, त्याप्रसंगी मातृभूमी शिक्षण संस्थेचे संचालक प्रा. आण्णासाहेब राऊत यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.त्याप्रसंगी साहेबांसोबत बराच वेळ मनसोक्त गप्पा होत असताना त्यांचे योग्य मार्गदर्शन मिळाले सामाजिक कार्य करत असताना सामाजिक संस्थांना स्वतःचा अर्थार्जनाचा सक्षम पर्याय जवळ असला पाहिजे,असा सल्ला उद्योजक संजय जोशी यांनी दिला,बराच वेळ चर्चा झाल्या नंतर साहेबांनी त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आपल्या “मातृभूमी”तील आयडियल सोशियल एज्युकेशन स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मधील विद्यार्थ्यांच्या बद्दल चौकशी केली. संस्थेची सद्य परिस्थिती याबद्दल चर्चा केली. आपल्या संस्थेच्या माध्यमातून परिसरातील प्रतिवर्षी १२० विद्यार्थ्यांना मोफत व सवलतीचे दर्जेदार शिक्षण देण्याचा उपक्रम चालू आहे.यासाठी संस्थेला प्रतिवर्ष १२,००,०००/- लक्ष रुपये खर्च येतो. यामुळे संस्थेला मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते.या विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक सुविधांचा अभाव आहे. संस्थेत विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना भौतिक सुविधेत येणाऱ्या अडचणी सांगितल्या,त्यानंतर त्यांना बोलता बोलता विद्यार्थ्यांना शाळेत बसण्यासाठी बैठक व्यवस्था नाही असे सांगितले,



त्यानंतर त्यांनी विचारले आपल्याला कसली बैठक व्यवस्था अपेक्षित आहे... त्यावर मी त्यांना शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी ३ विद्यार्थी प्रति डेस्क याप्रमाणे १२० डेस्क आवश्यक आहेत असे सांगितले. त्यावर त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता यावर्षी विद्यार्थ्यांसाठी आवश्यक १२० डेस्क देण्याचा प्रयत्न करू असा विश्वास दिला. सुरुवातीला ३० डेस्क आपण देऊ! लवकरच उर्वरित डेस्कची ही सुविधा उपलब्ध करू असा शब्द उद्योजक संजयजी जोशी यांनी दिला. साहेबांच्या या मदतीने बऱ्याच सर्वसामान्य, गोरगरीब,ऊसतोड कामगार, आर्थिक दृष्ट्या मागास,विधवा अपत्य,बालकामगार, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुलं, परिसरात गरजू विद्यार्थी यांना शिक्षण देण्यासाठी अजून मोठी ऊर्जा मिळाली. साहेबांची ही लाख मोलाची मदत आम्हाला कोटी मोलाची असेल. मातृभूमीतील विद्यामंदिर आपल्यामुळे या मदतीमुळे काही प्रमाणात सुसज्ज होत आहे.या वेळी संस्थेचे संचालक प्रा.आण्णासाहेब राऊत यांनी संस्थेच्या वतीने उद्योजक मा.श्री. संजयजी शिंदे यांचे आभार व्यक्त करून त्यांचा यथोचित सत्कार केला

**साहेबांनी तात्काळ ३३०० प्रति डेस्क प्रमाणे ३० साठी १००,०००/- लक्ष रुपये देऊन संस्थेला गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी भरीव अशी मदत केली.**

# दुष्काळी सोयगाव तालुक्यात सरसकट पीकविमा द्या-

# जिल्हा सरचिटणीस संजीवन सोनवणे यांनी दिले निवेदन



**प्रतिनिधी/सोयगाव**

खरिपाच्या हंगामात दुष्काळ जाहीर झालेल्या सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना सरसकट खरिप पिकविम्याचे रक्कम द्या या मागणीसाठी तालुका भाजपा च्या वतीने शुक्रवारी सोयगाव तहसील कार्यालयात जिल्हा सरचिटणीस संजीवन सोनवणे यांचा नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले आहे सोयगाव तालुक्यात एकीकडे गंभीर दुष्काळ जाहीर झालेला असताना दुसरीकडे पीकविमा कंपनीने केवळ तक्रारी केलेल्या शेतकऱ्यांना च खरिपाच्या पिकविम्याचे रक्कम दिली असून सोयाबीन क्षेत्र पिकविम्यामधून वगळून टाकले आहे पीकविमा कंपनीने ऐन दुष्काळातही सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांची चेष्टा केली असल्याचे आरोप संजीवन सोनवणे यांनी केला आहे या कंपनीचे कारभाराची चौकशी करून तातडीने बाधित शेतकऱ्यांना सरसकट पीकविमा द्यावा अशी मागणी निवेदनात आहे निवेदनावर संजीवन सोनवणे, सुनील गव्हांडे,मयूर मनगटे,किशोर काळे,आदींसह शेतकऱ्यांच्या स्वाक्षरी आहे....

## वकीलाचे घर फोडणारे दोन चोरटे जेरबंद
## माजलगाव पोलिसांनी अवघ्या 6 तासात लावला तपास

माजलगाव, (प्रतिनिधी):- बाहेरगावी गेलेल्या वकिलाच्या घराचे कुलूप तोडून घरातील सोन्याच्या दागीनेसह रोख रक्कम पळविन्याची घटना बुधवार दि. २३ रोजी घडली होती. या घटनेतील एका संशियतासह एका अल्पवयीन आरोपीला पोलिसांनी जेरबंद केले. दरम्यान घटना घडल्याच्या अवघ्या ६ तासात पोलिसांनी हा तापास पूर्ण केल्याने पोलिसांच्या कर्तबगारीचे कौतुक होत आहे. शहरातील शिवाजी चौक, शाहुनगर येथे राहत असलेले ॲड. आजित रामभाऊ जगताप यांच्या घरी बुधवारी चोरी झाल्याची घटना निदर्शनास आली होती. यावेळी चोरट्यांनी कपाटातील ठेवलेले सोन्याची तीन तोळ्याची चैन, तीन तोळ्याचे ब्रास्लेट, पत्नीच्या कानातील रिंग, झुंबर, नाकातील नथनी, मुलीच्या कानातील रिंग, मुलीचे हातातील सोन्याचे एक तोळ्याचे कडे असे आठ तोळ्याचे दागीने नगदी सात हजार पाचशे रूपये अज्ञात चोरट्यांनी पळविले होते. दरम्यान पोलिसांनी पंचनामा करुन श्वान पथकास पाचरण केले. गोपनीय पद्धतीने तपास केला. व गुन्हा दाखल झाल्याच्या अवघ्या ६ तासात चोरीच्या या घटनेतील एका संशयीतासह अल्पवयीन असणाऱ्या का आरोपीला ताब्यात घेतले. या चोरी प्रकरणात आणखी इतर कोणी सहभागी आहेत का? याचा शोध पोलिसांकडून घेतल्या जात आहे.

# बंकट स्वामी महाराज वारकरी सांप्रदाया मधील महान सत - श्री. मच्छिंद्र घरत.

**प्रतिनिधी/बीड**

समाजाला योग्य मार्ग दाखविण्याचे महान कार्य येथील संतांनी केले आहे. वारकरी संप्रदायाची पताका पुढे घेऊन जाण्यामध्ये अनेक संत-महंतांचे योगदान आहे. श्री. बंकट स्वामी महाराज यांनी वारकरी संप्रदायामध्यमातून महाराष्ट्रतील समाजाला योग्य मार्ग दाखविणारे महान संत आहेत. असे प्रतिपादन श्री. बंकट स्वामी शिक्षण संस्थाचे सचिव श्री. मच्छिंद्र घरत यांनी केले आहे. येथील श्री. बंकट स्वामी शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यालयामध्ये श्री. बंकट स्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी निमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाला संस्था उपाध्यक्ष प्रा. गणेश पोकळे, दत्ता जगदाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना घरत म्हणाले की, महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाला मोठी परंपरा आहे. अनेक संत-महंतांनी आपले पुर्ण जीवन समाजाच्या हितासाठी




समर्पित केले आहे. असे महान कार्य श्री. जगदगुरु बंकटस्वामी महाराज यांनी समाजाच्या कल्याणासाठी केली आहे, असेही घरत म्हणाले. या कार्यक्रमाला सुपेकर सर,हाकदार सर,श्री. महेश नेवडे, विकास, बंडू सोनवणे आदी उपस्थित होते.

# नितीन काळे यांचा मृतदेह तलावात फुगून आला वर.

**प्रतिनिधी/केज**

केज तालुक्यातील जिवाची वाडी येथील साठवण तलावात दारू पिऊन नशेत दि.२३- गुरुवारी दुपारी १२ वाजता मासे धरण्यासाठी गेले नितीन मच्छिंद्र काळे वय-३४ वर्ष यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला त्यांना पोहता येत होते!परंतू ते मासे पकडण्यासाठी पोहत जाताच त्यांचा मृत्यू झालेचे प्रथम समयी माहिती वरून दिसून आले.मृत्तदेह



शोधन्यासाठी परळी-वै.येथील बचावकार्य पथकास पाचारन केले.परंतू २३ तासा नंतर नितीन काळे यांचा मृतदेह आपोआप तलावातील पाण्यात फुगून वर आल्याचे दिसताच येथील स्थानीक मासेमारी करनारे पांडुरंग मारूती चुंबळे व बचावकार्य पथक यांनी मृतदेह पाण्यातुन बाहेर काढला,केज पोलीस स्टेशन अंतर्ग विडा बिटचे राजु वंजारे व शेख समीन पाशा यांनी प्रेताचा पंचनामा केला,यावेळी गुरूवार रात्री केज तहसीलदार अभिजीत जगताप चार तास घटनास्थळी तळठोकून दाखल,तलाठी उत्तरेश्वर घुले,ग्रामविकास अधिकारी महिंद्र मुंडे,शासकीय अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते नंतर प्रेत ग्रामीण रुग्णालय,विडा येथे शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले व दुपारी ठिक ०३:०० वाजता त्यांच्या मुळ गावी जिवाची वाडी येथील शमशानभुमी येथे संत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पाश्चात पत्नी,मुलगी-१,मुलगा-१,आई, वडील असा परिवार आहे.

# गरिबांच्या कोट्यावधी रुपयांवर डल्ला मारणा-या चंदूलाल बियाणीसह १७ संचालकांवर ४२०चा गुन्हा दाखल

ठेवीदारांच्या बर्याच प्रतीक्षेनंतर अखेर आज पहाटे २.४७ वाजता राजस्थानी मल्टीस्टेटवे अध्यक्ष चंदुलाल बियाणी यांच्यासह १७ संचालक, अधिकारी, कर्मचार्या विरोधात परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला, मल्टीस्टेटवे परळी मुख्यालय असताना देखील गुन्हा होत नसल्याने तमाम ठेवीदारात संताप व्यक्त होत होता, उशिरा का असेना पोलिसांना जाग आली अन् भल्या पहाटे परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याने समाधान व्यक्त होत आहे. याचाबत सविस्तर माहिती अशी की, गेली अनेक महिन्यांपासून राजस्थानी मल्टीस्टेटचे अध्यक्ष चंदुलाल बियाणी यांच्यासह अख्ख संचालक मंडळ ठेवीदारांचे जवळपास ३०० कोटी बुडवत परळीतील मुख्य शाखेसह सर्व शाखा बंद करून पोबारा केल्याची संतापजनक घटना घडली. यामध्ये ज्या ठेवीदारांनी चंदुलाल बियाणी आणि संचालक मंडळावर मोठा विश्वास ठेवून भविष्यात आपल्या दवाखाना, लार समारंभ, मुलांचे शिक्षण, व्यवसाय, शेती आदीसाठी पैसा कामी येईल आणि महिन्यांचा खर्च व्याजाच्या स्वरूपात उचलून आपला उदरनिर्वाह भागवावा ह्या उद्देशाने लाखो रुपयांच्या ठेवी राजस्थानी मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह मध्ये ठेवल्या. मात्र आपला अव्वाच्या सव्वा खर्च ठेवीदारांच्या पैशातून केल्यामुळे राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह डबघाईला आली परिणामी ठेवीदारांचे पैसे बुडण्यात जमा झाले. आपला मेहनतीचा पैसा बुडण्याच्या स्थितीत आल्यामुळे तमाम ठेवीदारांमध्ये मोठ्या संतापाची लाट उसळली आणि आपल्या पैशांच्या मागणीसाठी राजस्थानी मल्टीस्टेटच्या शाखेत चकरा खेटा मारण्यास प्रारंभ केला तरी देखील चंदुलाल बायाणी यांच्यासह अख्ख्या संचालक मंडळठेवीदारांचे पैशे देण्यासाठी असमर्थ ठरलं नंतर मात्र मुख्य शाखेसह सर्व शाखांना कुलूप लाबीत सर्वचजण फरार झाले. ठेवीदारांनी चंदलाल बियाणी यांच्यासह मल्टीस्टेटचे इतर संचालक अधिकारी कर्मचारी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र बर्याच महिन्यांपासून ते फोन उचलत नसून नॉट रिचेबल आहेत परिणामी दिवसेंदिवस ठेवीदारांमध्ये संतापाची लाट उसळत गेली. बरबटलेले पोलीस प्रशासन... गोरगरिचांचे कोट्यावधी रुपये घेऊन फरार झालेल्या राजस्थानी पतसंस्था, मल्टीस्टेटचे चेअरमन चंदलाल बियाणी आणि त्यांच्या संचालक मंडळांबर गुन्हा दाखल करण्यासाठी मागील दोन महिन्यापासून पोलीस ठाण्याची उंबरठे झिजवणाऱ्या शेकडो ठेवीदारांनी आक्रोश करूनही पोलीस प्रशासनाला दया माय आली नाही त्याचे कारणे तसेच आहे बीड प्रमाणे परळी पोलीस प्रशासनही चंदलाल बियाणी आणि त्यांच्या संचालक मंडळाला अटक करू नये यासाठी बरबटून गेले असल्याचा आरोप अनेक ठेवीदारांनी केला आहे. परंतु ठेवीदारांनी गुन्हा दाखल करावा यासाठी दिवसेंदिवस आंदोलनाचा पवित्रा घेत असल्याचे पाहून अखेर पोलीस प्रशासनाने ठेवीदारांसमोर गुडघे टेकत आज अखेर गुन्हा दाखल करावाच लागला विशेष म्हणजे हा गुन्हा तात्काळ होणे गरजेचे होते

# बीडच्या जटाशंकर मंदिरात रिध्दी- सिध्दी गणेश विवाह



बीड: शहरातील जटाशंकर मंदिरात सुरू असलेल्या शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञात शुक्रवारी सायंकाळी असंख्य भाविकांच्या उपस्थीतीत रिद्धी- सिध्दी गणेश विवाह सोहळा थाटात पार पडला. संभाजीनगर येथील कथाकार सौ. वसुंधराताई श्रीपाद पाठक यांनी तुलसी उत्पत्ती, त्रिपुरासुर दहन, तुलसी गंगा उत्पतीची कथा सांगीतली.

# वेळ आली तर आपला उमेदवार द्यायचा नाही, पण त्यांना पाडल्या शिवाय शांत बसायचं नाही-मनोज जरांगे यांचा इशारा ?

**बीड प्रतिनिधी..** देशात लोकसभेच्या निवडणुकीसाठी पाच टप्प्यांत मतदान पार पडले. आता आणखी दोन टप्पे बाकी आहेत. तर महाराष्ट्रातील पाचही टप्प्यांतील मतदान पार पडलेले आहे. या लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे. त्यानंतर काही महिन्यातच महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीची रंगत संपताच विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी पाहायला मिळणार आहे. विधानसभा निवडणुकीत मनोज जरांगे पाटील यांनी उमेदवार उभे करण्यासंदर्भात अनेकदा सूचक विधाने केली आहेत. असे असतानाच त्यांनी आता पुन्हा एकदा मोठं विधान केलं आहे. वेळ आली तर आपला उमेदवार द्यायचा नाही. पण त्यांना पाडल्याशिवाय शांत बसायचं नाही, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. त्यामुळेत्यांच्या विधानाचा रोख नेमकं कुणाकडे आहे? यासंदर्भात आता तर्कवितर्क लावण्यात येत काहींचं म्हणणं होतं की मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण मिळवून द्यायचं नाही. काहींचं म्हणणं आहे की, मी जातीवाद करतो. सगळ्याचं म्हणणं आहे मराठा आणि ओबीसी वाद होत आहे. मात्र, हा वाद कोणी केला? मी अगोदर ओबीसी बांधवांना दुखावलं असं माझं एक तरी विधान दाखवा. जातीवाद कोणी केला? मग तुम्ही आम्हाला जातीवादी कसे म्हणता? १३ तारखेच्या मतदानापर्यंत मी चांगला होतो किंवा माझा मराठा समाज चांगला होता. १३ तारीख झाली मतदान संपलं आणि गुरगुर करायला पुन्हा सुरवात केली, असं मनोज जरांगे म्हणाले.







# जोग महाराज परंपरेतील ओजस्वी वाणीचे तेजस्वी हिरे संत बंकटस्वामी - उल्हास महाराज सूर्यवंशी..

## बंकटस्वामी महाराज संस्थानने सामाजिक सलोख्याचा आदर्श घालून दिला- मनोज दादा जरांगे

१) सप्ताहामध्ये महाप्रसाद ८० पोते साखर ,२५ क्विंटल दाळ तर तेल २० टाकी आणि ५०० पोते मुरमुरे यामुळे १लाख भाविक भक्तगण प्रसाद घेवुन तृप्त झाले. भाविक भक्तांसाठी जार च्या थंडगार पाण्याची व्यवस्था केली होती.

२) महापंगतीमध्ये प्रसाद वाढण्याचे महत्वाचे काम नेकनूरच्या महिलां मंडळांनी केले.यामुळे प्रत्येकाला महाप्रसाद वेळेवर मिळाला. विशेष म्हणजे.१००० महिलांनी हें काम पार पाडलें.

३) बंकट स्वामी महाराज संस्थांच्या वतीने यावर्षी सेवा गौरव पुरस्काराने वारकऱ्यांना सन्मानित करण्यात आले यात स्वर सम्राट हरिकिसन महाराज देवकर यांच्यासह बंकट स्वामी संस्थान वरील वारकऱ्यांचा गौरव करण्यात आला.

४) नेकनूर मधील गणेश मंडळाच्या तरुण मंडळानी पार्किंग, पाणी, स्वच्छता, सुरक्षा, सर्व चोख व्यवस्था करण्यासाठी मोठी मेहनत घेतली.अन्नदान कमेटीने सर्वांनां मार्गदर्शन केले

५) यावर्षी बंकट स्वामी महाराज पुण्यतिथी उत्सवात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये तब्बल १३० लोकांनी रक्तदान केले.





1)नेकनूर येथे भव्य अखंड हरीनाम सप्ताहात काल्याचे कीर्तन करताना उल्हास महाराज सूर्यवंशी हजोरोच्या संख्येने भाविक भक्त,महिला ,पुरुष उपस्थिति होते.. महाप्रसादाच्या पंक्तीमध्ये महाप्रसाद वाटपाचे काम करताना महिला भगिनी...नेकनूर मधील मुस्लिम बांधवांनी पुण्यतिथी उत्सवात घेतला सहभाग भाविकांना पाणी वाटप करत सर्वधर्म ऐकण्याची..

मनोज जरांगे... यावेळी मनोगत व्यक्त करताना मराठा योद्धे मनोज दादा जरांगे पाटील यांनी संत बंकट स्वामी महाराजांनी सर्व जाती धर्मातील शिष्य घडवले. आजच्या सामाजिक परिस्थितीमध्ये विश्वास ठेवण्यासारखे एकच व्यासपीठ शिल्लक आहे ते म्हणजे धार्मिक व्यासपीठ या व्यासपीठावर मी कुठलाही विषय घेत नाही. त्यातच बंकटस्वामी महाराजांनी परमार्थातील आदर्श महाराष्ट्राला दिला असही मनोज दादा म्हणाले.

- ज्योतीताई विनायक मेटे मेटे साहेबांनी कीर्तन मंडपाचा दिलेला शब्द पाळण्यासाठी मला बंकटस्वामींनी आशिर्वाद दिला त्यातूनच हा कीर्तन मंडप उभा राहिला.. आज माझ्या एका डोळ्यात हसू आणि एका डोळ्यात आसू आहे..

- माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर. बंकट स्वामी महाराजांनी महाराष्ट्रात हजारो शिष्य घडवले. बीड जिल्ह्यातील भगवान बाबा आणि वामन भाऊ सारखे हिरे हि बंकट स्वामींची देन आहे. बंकट स्वामी संस्थान हे आध्यात्मिक विद्यापीठ आहे असे जयदत्त क्षीरसागर म्हणाले.

- नंद किशोर मुंदडा.. संत बंकट स्वामी संस्थानची सेवा करण्याचे भाग्य मिळाल.यातच मोठा आनंद आहे. विकास कामासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही

**नेकनूर -(प्रतिनिधी)** दि-२४ वारकरी संप्रदायाचे भक्ती सूर्य महान संत वै बंकटस्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी उत्सवाची शुक्रवारी दुपारी काल्याच्या कीर्तनांने थाटात सांगत झाली. सकाळी समाधी अभिषेक करण्यात आला तर दुपारी ११ ते २ या वेळेत श्री ह भ प गु उल्हास महाराज सूर्यवंशी यांचे सुश्राव्य काल्याचे कीर्तन संपन्न झाले. या सोहळ्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखों भाविक भक्तांनी उपस्थिति लावली होती. यात प्रमुख संत महंत उपस्थिति श्री ह भ प महादेव महाराज चाकरवाडी कर, श्रीहरी महाराज पवार,श्री ह भ प पांडूरंग महाराज क्षिरसागर ज्ञानेश्वरी कंठस्थ,श्री ह भ प स्वामी स्वरूपानंद सरस्वती,श्री ह भ प नवनाथ महाराज जरुड,श्री ह भ प पंढरीनाथ महाराज डोंगर जाटनांदूर , सुधाकर महाराज ज्ञानेश्वर महाराज पिसे आळंदी.. या संत महंतांनी उपस्थित होते. तर सामाजिक व राजकीय उपस्थिती, मराठा आरक्षण योध्ये मनोज दादा जरांगे पाटील, माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर, ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा ,डॉ ज्योतीताई मेटे डॉ योगेश क्षिरसागर,आ. पृथ्वीराज साठे , सुरेश पाटील केज, दिनकरराव कदम, नारायण काशीद शिवसंग्राम, बळीराम गवते, सखाराम मस्के अरुण नाना डाके, नानासाहेब काकडे पाटील,तानाजी कदम, सुग्रीव रसाळ,यांच्या सह बंकटस्वामी संस्थान चे सर्व विश्वस्त उत्सव कमेटी नेकनूर पंचक्रोशी व हजारो भाविकांची उपस्थिती होती. श्री क्षेत्र नेकनूर येथे महान संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८०व्या पुण्यतिथी उत्सवा काल्याचे किर्तन पुष्प गुंफताना श्री ह भ प उल्हास महाराज सूर्यवंशी, यांनी तुझिये संगति । जाली आमुची निश्चिति ॥१॥ नाहीं देखिलें तें मळे । भोग सुखाचे सोहळे ॥ध्रु.॥ घरीं ताकाचें सरोवर । येथें नवनीताचे पूर ॥२॥ तुका म्हणे आतां । आम्ही न वजों दवडितां ॥३॥ या अभंगावर सुंदर चिंतन मांडले अभंगाच्या माध्यमातून संत तुकाराम महाराज देव आणि भक्त यांच्यामधील संवाद प्रगट करतात.. भक्त देवाला म्हणत असताना म्हणतात की तुझ्या संगतीने आमच्या जीवनामध्ये निश्चितता प्राप्त झाली.. जे कधीच पाहिलं नव्हतं ते सुख आणि त्यांचे सोहळे आम्हाला तुझ्या संगती मध्ये मिळत आहेत. आमच्या घरी जर पाहिलं तर काकाची सरोवर आहेत आणि तुझ्याकडे नवनिताचे पूर आहेत त्यामुळे तू काढून द्यायचा प्रयत्न केला तरी आम्ही तुझ्या पासून दुर जाणार नाहीत. हा भाव अभंगातून मांडला.. यावेळी संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८० वी पुण्यतिथी अशाच पद्धतीने वैकुंठात देखील साजरी होत असेल असा विश्वास महाराजांनी व्यक्त केला .जोग महाराज परंपरेतील ओजस्वी वाणीचे तेजस्वी हिरे संत बंकटस्वामी महाराज होते.तसेच स्वामी महाराज तप आणि भक्ती परंपरा होते.स्वामी महाराज ८० महिने आईच्या उदरात राहिले. आळंदी येथिल वारकरी शिक्षण संस्थेला उर्जित अवस्था आणायचे काम स्वामी महाराज यांनी केले .संपुर्ण महाराष्ट्र भर पायाला भिंगरी लावून फिराले. संस्थेला स्थैर्य निर्माण करून दिले. काकडा भजन आणि वानिमध्ये गोडवा होता..साधू गेल्यावर धवल कीर्ती शिल्लक राहते. स्वामी महाराजांचे तेज सुदाम देव महाराजांकडे होते तर सुदाम देव महाराजांचे तेज आज मेंगडे महाराजांकडे आहे असेही महाराज म्हणाले.. काल्याच्या कीर्तनामध्ये भगवान श्रीकृष्णाच्या गोकुळातील व मथुरेतील लीला सांगितल्या तसेच श्री गुरु बंकटस्वामी महाराज यांच्या चरित्रातील काही आठवणी सांगितल्या यावेळी कीर्तनाला साथ संगत.. महाराष्ट्रातील नामांकित गायनाचार्य ओंकार महाराज कागदे कैलास महाराज पवार दत्ता महाराज सटले अमोल महाराज पवार अभिमान महाराज ढाकणे, श्री गुरु बंकट स्वामी महाराज यांची फडावरील सर्व गुणवान पैकी श्री ह भ प नाना महाराज कदम श्री ह भ प सुरेश महाराज जाधव. श्री ह भ प सत्यवान महाराज लाटे, श्री ह भ प रंजीत महाराज शिंदे श्री ह भ प दिनेश महाराज काळे,अच्युत महाराज घोड्के आदिंची उपस्थिति होती,तसेच हजारो च्या संख्येने भाविक भक्ति व बंकट स्वामी महाराज फडावरील सर्व टाळकरी उपस्थित होते शेवटी काल्याच्या अभंग म्हणून दही हंडी फोडुन महाप्रसाद वाटप करण्यात आला , लाखोंच्या पंगतीत मध्ये बूंदी आणि चिवडा याचा महाप्रसाद वाटप करण्यात आला


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com